https://marathmola.in/

# 300+ मराठी भाषेतील म्हणी व त्याचे अर्थ

| अनु. क्र | म्हणी | अर्थ |
|---|---|---|
| 1 | आपलेच दात आपलेच ओठ | आपल्याच माणसाने चूक केल्यास अडचणीची परिस्थिती निर्माण होते. |
| 2 | आपल्याच पोळीवर तूप ओढणे | फक्त स्वतःचाच तेवढा फायदा साधून घेणे. |
| 3 | आयजीच्या जीवावर बायजी उदार | दुसऱ्याचा पैसा खर्च करून औदार्य दाखवणे. |
| 4 | आयत्या बिळावर नागोबा | एखाद्याने स्वतःकरिता केलेल्या गोष्टीचा आयता फायदा घेण्याची वृत्ती असणे. |
| 5 | आलिया भोगासी असावे सादर | तक्रार व कुरकुर निर्माण झालेली परिस्थिती स्वीकारणे. |
| 6 | आवळा देऊन कोहळा काढणे | आपला स्वार्थ साधण्यासाठी एखाद्या व्यक्तीला लहान वस्तू देऊन मोठी वस्तू मिळविणे. |
| 7 | इकडे आड तिकडे विहीर | दोन्ही बाजूंनी सारखीच अडचणीची स्थिती निर्माण होणे. |
| 8 | इच्छा परा ते येई घरा | आपण जे दुसऱ्याच्या बाबतीत चिंतितो तेच आपल्या वाट्याला येणे. |
| 9 | इच्छिलेले जर घडते तर भिक्षूकही राजे होते | इच्छेप्रमाणे सारे घडले तर सारेच लोक धनवान झाले असते. |
| 10 | इन मीन साडेतीन | एखाद्या करण्यासाठी अगदी कमीत कमी लोक हजर असणे. |
| 11 | ईश्वर जन्मास घालतो त्याचे पदरी शेर बांधतो | जन्मास आलेल्याचे पालन पोषण होतेच. |
| 12 | उंदराला मांजर साक्ष | ज्याचे एखाद्या गोष्टीत हित आहे त्याला त्या गोष्टीबाबत विचारणे व्यर्थ असते किंवा एखादे वाईट कृत्य करत असताना एकमेकांना दुजोरा देणे. |
| 13 | उंदीर गेला लुटी आणल्या दोन मुठी | प्रत्येक मनुष्य आपल्या क्षमतेनुसार काम करतो. |

| | | |
|---|---|---|
| 14 | उंबर पिकले आणि नडगीचे (अस्वलाचे) डोळे आले | फायद्याची वेळी येणे; पण लाभ न घेता येणे. |
| 15 | उकराल माती तर पिकतील मोती | मशागत केल्यास चांगले पीक येते. |
| 16 | उखळात डोके घातल्यावर मुसळाची भीती कशाला? | एखादे कार्य अंगावर घेतल्यानंतर त्यासाठी पडणाऱ्या श्रमांचा विचार करायचा नसतो. |
| 17 | उचल पत्रावळी, म्हणे जेवणारे किती? | जे काम करायचे ते सोडून देऊन भलत्याच चौकशा करणे. |
| 18 | उचलली जीभ लावली टाळ्याला | दुष्परिणामाचा विचार न करता बोलणे |
| 19 | उठता लाथ बसता बुक्की | प्रत्येक कृत्याबद्दल आदर घडविण्यासाठी पुन्हापुन्हा शिक्षा करणे. |
| 20 | उडत्या पाखराची पिसे मोजणे | अगदी सहज चालता – चालता एखाद्या अवघड गोष्टीची परीक्षा करणे. |
| 1 | उडाला तर कावळा, बुडाला तर बेडूक | एखाद्या गोष्टीची परीक्षा होण्यासाठी काही काळ वाट पहावी लागते. |
| 2 | उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग | अतिशय उतावीळपणाचे वर्तन करणे. |
| 3 | उतावळी बावरी (नवरी) म्हाताऱ्याची नवरी | अति उतावळेपणा नुकसान कारक असतो. |
| 4 | उथळ पाण्याला खळखळाट फार | अंगी थोडासा गुण असणारा माणूस जास्त बढाई मारतो. |
| 5 | उद्योगाचे घरी रिद्धी – सिद्धी पाणी भरी | जेथे उद्योग असतो तेथे संपत्ती येते. |
| 6 | उधारीची पोते, सव्वा हात रिते | उधारीने घेतलेला माल नेहमीच कमी भरतो. |
| 7 | उभारले राजवाडे तेथे आले मनकवडे | श्रीमंती आली की, तिच्या मागोमाग हाजी हाजी करणारेही येतातच. |
| 8 | उभ्याने यावे आणि ओणव्याने जावे | येते वेळी ताठ मानेने यावे आणि जातेवेळी खाली मान घालून जाणे. |
| 9 | उसाच्या पोटी कापूस | सद्गुणी माणसाच्या पोटी दुर्गुणी संपत संतती. |
| 10 | ऊराचे खुराडे आणि चुलीचे तुणतुणे | अतिशय हलाखीची स्थिती. |

| | | |
|---|---|---|
| 11 | ऊस गोड लागला म्हणून मुळासगट खाऊ नये | कोणत्याही चांगल्या गोष्टीचा किंवा चांगुलपणाचा प्रमाणाबाहेर फायदा घेऊ नये. |
| 12 | एक कोल्हा सतरा ठिकाणी व्याला | एका व्यक्तीपासून अनेक ठिकाणी उपद्रव होणे. |
| 13 | एक ना धड भाराभर चिंध्या | एकाच वेळी अनेक कामे करायला घेतल्याने सर्वच कामे अर्धवट होण्याची अवस्था. |
| 14 | एका कानावर पगडी, घरी बाईल उघडी | बाहेर बडेजाव पण घरी दारिद्र्य |
| 15 | एका खांबावर द्वारका | एकाच व्यक्तीवर सर्व जबाबदाऱ्या असणे. |
| 16 | एका पिसाने मोर होत नाही | थोड्याश्या यशाने हुरळून जाणे |
| 17 | एका मान्यात दोन तलवारी राहात नाहीत | दोन तेजस्वी माणसे गुण्या-गोविंदाने राहू शकत नाहीत. |
| 18 | एका माळेचे मणी | सगळीच माणसे सारख्याच स्वभावाची असणे. |
| 19 | एका हाताने टाळी वाजत नाही | दोघांच्या भांडणात पूर्णपणे एकट्यालाच दोष देता येत नाही. |
| 20 | एकाची जळते दाढी दुसरा त्यावर पेटवू पाहतो विडी | दुसऱ्याच्या अडचणींचा विचार न करता त्यातही स्वतःचा फायदा पाहण्याची दृष्टी ठेवणे. |
| 41 | एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरु मारु नये | दुसऱ्याने केलेल्या मोठ्या वाईट गोष्टींकडे बोट दाखवून आपण केलेल्या वाईट गोष्टीचे समर्थन करू नये. |
| 42 | एकावे जनाचे करावे मनाचे | लोकांचे ऐकून घ्यावे आणि आपल्या मनाला जे योग्य वाटेल ते करावे. |
| 43 | ऐंशी तेथे पंचाऐंशी | अतिशय उधळेपणाची कृती. |
| 44 | ऐरावत रत्न थोर \| त्यासी अंकुशाचा मार \| | मोठ्या व्यक्तीला यातनाही तेवढ्यात असतात. |
| 45 | ओझे उचलू तर म्हणे बाजीराव कोठे? | सांगितलेले काम सोडून नुसत्या चौकशा करणे. |
| 46 | ओढ फुटो (तुटो) किंवा खोकाळ फुटो/ शेंडी तुटो की तारंबी तुटो | कोणत्याही परिस्थितीत काम तडीस नेणे. |
| 47 | ओळखीचा चोर जीवे न सोडली | ओळखीचा शत्रू हा अनोळखी शत्रूपेक्षा भयंकर असतो. |

| | | |
|---|---|---|
| 48 | औटघटकेचे राज्य | अल्पकाळ टिकणारी गोष्ट. |
| 49 | कणगीत दाणा तर भिल उताणा | गरजेपुरते जवळ असले, कि लोक काम करत नाहीत किंवा कोणाची पर्वा करत नाहीत. |
| 50 | कधी तुपाशी तर कधी उपाशी | सांसारिक स्थिती नेहमी सारखी राहत नाही. |
| 51 | कर नाही त्याला डर कशाला ? | ज्याने काही गुन्हा किंवा वाईट गोष्ट केली नाही, त्याने शिक्षा होण्याचे भय कशाला बाळगायचे ? |
| 52 | करवतीची धार पुढे सरली तरी कापते, मागे सरली तरी कापते | काही गोष्टी केल्या तरी नुकसान होते नाही केल्या तरी नुकसान होते. |
| 53 | करावे तसे भरावे | जशी कृती केली असेल त्याप्रमाणे चांगले / वाईट फळ मिळणे. |
| 54 | करीन ते पूर्व | मी करेन ते योग्य, मी म्हणेन ते बरोबर अशा रीतीने वागणे. |
| 55 | करुन करुन भागला, देवध्यानी लागला | भरपूर वाईट कामे करून शेवटी देवपुजेला लागणे. |
| 56 | कशात-काय-अन-फाटक्यात-पाय | वाईटात आणखी वाईट घडणे |
| 57 | का ग बाई रोड (तर म्हणे) गावाची ओढ | निरर्थक गोष्टींची काळजी करणे. |
| 58 | कांदा पडला पेवात, पिसा हिंडे गावात | चुकीच्या मार्गाने शोध घेण्याचा मूर्खपणा करणे. |
| 59 | काकडीची चोरी फाशीची शिक्षा | अपराध खूप लहान; पण त्याला दिली गेलेली शिक्षा मात्र खूप मोठी असणे. |
| 60 | काखेत कळसा गावाला वळसा | जवळच असलेली वस्तू शोधण्यास दूर जाणे |
| 61 | काजव्याच्या उजळ त्याच्या अंगाभोवती | गोष्टींचा प्रभाव तेवढ्यापुरताच असतो. |
| 62 | काठी मारल्याने पाणी दुभंगत नाही | रक्ताचे नाते मोडू तोडू म्हणता तुटत नाही. |
| 63 | काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर होत नाही | जे काम भरपूर पैसा आणि होत नाही, ते थोड्याश्या अधिकाराने होते, संपत्तीपेक्षा सत्ता महत्त्वाची ठरते. |
| 64 | काडीचोर तो माडीचोर | एखाद्या माणसाने क्षुल्लक अपराध केला असेल तर त्याचा घडलेल्या एखाद्या मोठ्या अपराधाची संबंध जोडणे. |

| | | |
|---|---|---|
| 65 | काना मागुन आली आणि तिखट झाली | श्रेष्ठ पेक्षा कनिष्ठ माणसाने वरचढ ठरणे. |
| 66 | कानात बुगडी, गावात फुगडी | आपल्या जवळच्या थोड्याशा संपत्तीचे मोठे प्रदर्शन करणे. |
| 67 | काप गेले नी भोके राहिली | वैभव गेली अन फक्त त्याच्या खुणा राहिल्या |
| 68 | कामापुरता मामा | आपले काम करून घेईपर्यंत गोड गोड बोलणे. |
| 69 | काल महिला आणि आज पितर झाला | अतिशय उतावळेपणाची वृत्ती. |
| 70 | काळ आला; पण वेळ आली नव्हती | नाश होण्याची वेळ आली असताना थोडक्यात बचावणे. |
| 71 | कावळा बसला आणि फांदी तुटली | परस्परांशी कारण संबंध नसताना योगायोगाने दोन गोष्टी एकाच वेळी घडणे |
| 72 | कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही | शूद्र माणसाने केलेल्या दोषारोपांने थोरांचे नुकसान होत नसते. |
| 73 | कावीळ झालेल्यास सर्व पिवळे दिसते | पूर्वग्रहदूषित दृष्टी असणे. |
| 74 | कुंभारणीच्या घरातला किडा कुंभारणीचा | दुसऱ्याच्या स्वाधीन झालेला माणूस आपली मते विसरतो; आपल्या ताब्यात आलेल्या वस्तूवर आपलाच हक्क प्रस्थापित करणे. |
| 75 | कुडी तशी फोडी | देहा प्रमाणे आहार किंवा कुवतीनुसार मिळणे. |
| 76 | कुत्र्याची शेपूट नळीत घातले तरी वाकडे | मूळचा स्वभाव बदलत नाही. |
| 77 | कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ | स्वार्थासाठी केवळ दुष्ट बुद्धीने शत्रूला मदत करून आपल्याच माणसाचे नुकसान करणे. |
| 78 | केळी खाता हरखले, हिशेब देता चरकले | एखाद्या गोष्टीचा लाभ घेताना गंमत वाटते मात्र पैसे देताना जीव मेटाकुटीस येतो. |
| 79 | केळीला नारळी अन घर चंद्रमौळी | अत्यंत दारिद्र्याची अवस्था येणे. |
| 80 | केस उपटल्याने का मढे हलके होते ? | जेथे मोठ्या उपायांची गरज असते तेथे छोट्या उपायांनी काही होत नाही. |
| 81 | कोठे इंद्राचा ऐरावत, कोठे श्यामभट्टाची तट्टाणी | महान गोष्टींबरोबर शुल्लक गोष्टींची तुलना करणे. |

| | | |
|---|---|---|
| 82 | कोणाच्या गाई म्हशी आणि कोणाला उठा बशी | चूक एकाची शिक्षा दुसऱ्याला |
| 83 | कोल्हा काकडीला राजी | लहान लहान गोष्टींनी खुश होतात. |
| 84 | कोळसा उगाळावा तितका काळाच | वाईट गोष्टीबाबत जितकी चर्चा करावी तितकीच ती वाईट ठरते. |
| 85 | खर्चणार्याचे खर्चते आणि कोठावळ्याचे पोट दुखते | खर्च करणाऱ्याचा खर्च होतो ; तो त्याला मान्य ही असतो; परंतु दुसराच एखादा त्याबद्दल कुरकुर करतो. |
| 86 | खऱ्याला मरण नाही | खरे कधीच लपत नाही. |
| 87 | खाई त्याला खवखवे | जो वाईट काम करतो त्याला मनात धास्ती वाटते. |
| 88 | खाऊ जाणे तो पचवू जाणे | एखादे कृत्य धाडसाने करणारा त्याचे परिणाम भोगण्यास ही समर्थ असतो. |
| 89 | खाऊन माजावे टाकून माजू नये | पैशाचा, संपत्तीचा गैरवापर करू नये. |
| 90 | खान तशी माती | आई-वडिलांप्रमाणे त्यांच्या मुलांचे वर्तन असणे. |
| 91 | खायला काळ भुईला भार | निरूपयोगी मनुष्य सर्वांनाच भारभूत होतो. |
| 92 | खोट्याच्या कपाळी गोटा | खोटेपणा वाईट काम करणाऱ्यांचे नुकसान होते. |
| 93 | ग ची बाधा झाली | गर्व चढणे |
| 94 | गरज सरो, वैद्य मरो | एखाद्या माणसाची आपल्याला गरज असेपर्यंत त्याच्याशी संबंध ठेवणे व गरज संपल्यावर ओळखही न दाखवणे. |
| 95 | गरजवंताला अक्कल नसते | गरजेमुळे अडणाऱ्याला दुसऱ्याचे हवे तसे बोलणे व वागणे निमूटपणे सहन करावे लागते. |
| 96 | गरजेल तो पडेल काय | केवळ बडबडणार्या माणसाकडून काही घडत नाही. |
| 97 | गर्वाचे घर खाली | गर्विष्ठ माणसाची शेवटी फजितीच होते. |
| 98 | गळ्यात पडले झुंड हसून केले गोड | गळ्यात पडल्यावर वाईट गोष्टी सुद्धा गोड मानून घ्यावे लागते. |

| | | |
|---|---|---|
| 99 | गळ्यातले तुटले ओटीत पडले | नुकसान होता होता टळणे. |
| 100 | गाड्याबरोबर नळ्याची यात्रा | मोठ्यांच्या आश्रयाने लहानांचाही फायदा होणे. |
| 101 | गाढवाचा गोंधळ व लाथांचा सुकाळ | मूर्खांच्या गोंधळात एकमेकांवर दोषारोप करण्यात वेळ जातो. |
| 102 | गाढवाच्या पाठीवर गोणी | एखाद्या गोष्टीची फक्त अनुकूलता असून उपयोग नाही तर तिचा फायदा घेता यायला हवा. |
| 103 | गाढवापुढे वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता | मुर्खाला कितीही उद्देश केला तरी त्याचा उपयोग नसतो. |
| 104 | गाढवाला गुळाची चव काय ? | ज्याला एखाद्या गोष्टीचा गंध नाही त्याला त्या गोष्टीचे महत्त्व कळू शकत नाही. |
| 105 | गाय व्याली, शिंगी झाली | अघटित घटना घडणे. |
| 106 | गाव करी ते राव न करी | श्रीमंत व्यक्ती स्वतःच्या बळावर जे करू शकणार नाही ते सामान्य माणसे एकीच्या बळावर करू शकतात. |
| 107 | गोगलगाय न पोटात पाय | बाहेरून दिसणारी पण मनात कपट असणारी व गुप्तपणे खोडसाळपणा करणारी व्यक्ती. |
| 108 | घडाई परिस मडाई जास्त | मुख्य गोष्टीपेक्षा आनुषंगिक गोष्टींचा खर्च जास्त असणे. |
| 109 | घर ना दार देवळी बिर्हाड | शिरावर कोणती जबाबदारी नसलेली व्यक्ती. |
| 110 | घर फिरले म्हणजे घराचे वासेही फिरतात | एखाद्यावर प्रतिकूल परिस्थिती आली म्हणजे सारे त्याच्याशी वाईटपणे वागू लागतात. |
| 111 | घरचे झाले थोडे व्याह्याने धाडले घोडे | अडचणीत आणखी भर पडण्याची घटना घडणे |
| 112 | घरोघरी मातीच्या चुली | एखाद्या बाबतीत सामान्यता सर्वत्र सारखीच परिस्थिती असणे. |
| 113 | घेता दिवाळी देता शिमगा | घ्यायला आनंद वाटतो तर द्यायच्या वेळी मात्र बोंबाबोंब. |
| 114 | घोडे कमावते आणि गाढव खाते | एकाने कष्ट करावे व निरुपयोगी व्यक्तीने त्याचा गैर फायदा घ्यावा. |
| 115 | चवलीची कोंबडी आणि पावली फळणावळ | मुख्य गोष्टीपेक्षा देखभालीचा खर्च जास्त असणे. |

| | | |
|---|---|---|
| 116 | चार जणांची आई बाजेवर जीव जाई | जबाबदारी अनेकांची असेल तर काळजी कोणीच घेत नाही. |
| 117 | चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे | प्रत्येकाला अनुकूल परिस्थिती येतेच. |
| 118 | चालत्या गाडीला खीळ | व्यवस्थित चालणाऱ्या कार्यात अडचण निर्माण होणे. |
| 119 | चिंता परा येई घरा | दुसऱ्याचे वाईट चिंतित राहिले, कि ते आपल्यावरच उलटते. |
| 120 | चिखलात दगड टाकला आणि अंगावर शिंतोडे घेतला | स्वतःच्याच हाताने स्वतःची बदनामी करून घेणे. |
| 121 | चुलीपुढे शिपाई अन घराबाहेर भागुबाई | घरात तेवढा शूर पणाचा आव आणायचा पण बाहेर मात्र घाबरायचे. |
| 122 | चोर सोडून संन्याशालाच फाशी | खर्या अपराधी माणसाला सोडून निरपराधी माणसाला शिक्षा देणे. |
| 123 | चोरांच्या हातची लंगोटी | ज्याच्याकडून काही मिळण्याची आशा नसते त्याच्याकडून थोडेतरी मिळणे. |
| 124 | चोराची पावली चोराला ठाऊक | वाईट माणसांनाच वाईट माणसांच्या युक्त्या कळतात. |
| 125 | चोराच्या उलट्या बोंबा | स्वतः गुन्हा करून दुसऱ्याला दोष देणे. |
| 126 | चोराच्या मनात चांदणे | वाईट कृत्य करणाऱ्याला आपले कृत्य उघडकीला येईल की काय अशी सतत भीती असते. |
| 127 | चोरावर मोर | एखाद्या गोष्टीच्या बाबतीत दुसऱ्याला वरचढ ठरणे. |
| 128 | जलात राहून माशाशी वैर करू नये | ज्यांच्या सहवासात रहावे लागते त्यांच्याशी शत्रुत्व करू नये. |
| 129 | जळतं घर भाड्याने कोण घेणार ? | नुकसान करणाऱ्या गोष्टीचा स्वीकार कोण करणार ? बुडत्या बँकेचा पुढल्या तारखेचा चेक कोण घेणार ? |
| 130 | जळे आणि हनुमान बेंबी चोळे | दुसऱ्याचे नुकसान करून नामानिराळे राहणे |
| 131 | जशी देणावळ तशी धुणावळ | मिळणाऱ्या मोबदल्याच्या प्रमाणातच काम करणे. |

| | | |
|---|---|---|
| 132 | जानवे घातल्याने ब्राह्मण होत नाही | बाह्य देखाव्याने माणूस ज्ञान होत नाही. |
| 133 | जारात तुरी भट भटणीला मारी | काल्पनिक गोष्टीवरुन भांडण करणे |
| 134 | जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे | दुसऱ्याच्या स्थितीत आपण जावे तेव्हा तिचे खरे ज्ञान होते. |
| 135 | जीत्या हुळहुळे आणि मेल्या कानवले | जितेपणी दुर्लक्ष करायचे व मेल्यावर कोड कौतुक करायचे. |
| 136 | जे न देखे रवि ते देखे कवी | जे सूर्य पाहू शकत नाहीत ते कवी कल्पनेने पाहू शकतो. |
| 137 | जेवेण तर तुपाशी नाही तर उपाशी | अतिशय दुराग्रहाचे किंवा हटवादीपणाची वागणे. |
| 138 | जो गुळाने मरतो त्याला विष कशास ? | जिथे गोड बोलून काम होते तिथे जालीम उपायांची गरज नसते. |
| 139 | ज्या गावच्या बोरी, त्या गावच्या बाभळी | एकच स्वभाव असलेल्या माणसाने एकमेकांची वर्मी काढण्यात अर्थ नसतो, कारण एकाच ठिकाणची असल्याने ते एकमेकांना पुरेपूर ओळखतात. |
| 140 | ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी | जो आपल्यावर उपकार करतो त्या उपकारकर्त्याचे स्मरण करून गुणगान गावे. |
| 141 | ज्याचे करावे बरे तो म्हणतो माझेच खरे | एखाद्याचे भले करायला जावे तर तो त्या गोष्टीस विरोधच करतो व आपलाच हेका चालवण्याचा प्रयत्न करतो. |
| 142 | ज्याच्या हाती ससा, तो पारधी | ज्याच्या हाती वस्तू असते त्याला त्याविषयीचे कर्तृत्व बहाल केले जाते, म्हणजेच एकाचे कर्तृत्व; पण ते दुसऱ्याच्या नावे गाजणे. |
| 143 | झाकली मूठ सव्वा लाखाची | व्यंग नेहमी झाकून ठेवावे. |
| 144 | टाकीचे घाव सोसल्यावाचुन देवपण येत नाही | कष्ट सोसल्याशिवाय मोठेपण येत नाही. |
| 145 | डोळ्यात केर आणि कानात फुंकर | रोग एका जागी व उपचार दुसऱ्या जागी. |
| 146 | ढवळ्या शेजारी पवळ्या बांधला वाण नाही, पण गुण लागला | वाईट गुण मात्र लवकर लागतात म्हणजेच वाईट माणसांच्या संगतीने चांगला माणूसही बिघडतो. |

| | | |
|---|---|---|
| 147 | ढेकणाच्या संगे हिरा जो भंगला, कुसंगे नाडला साधू तैसा | वाईट संगतीचे वाईटच परिणाम असतात. |
| 148 | तट्टाला टूमणी, तेजीला इशारत | जी गोष्ट मूर्खाला शिक्षेने ही समजत नाही ती शहाण्याला मात्र फक्त इशाऱ्याने समजते. |
| 149 | तरण्याचे कोळसे, म्हाताऱ्याला बाळसे | अगदी उलट गुणधर्म दिसणे. |
| 150 | तळे राखील तो पाणी चाखील | ज्याच्याकडे एखादे काम सोपवले तो त्याच्यापासून काहीतरी फायदा करून घेणारच. |
| 151 | ताकापुरते रामायण | एखाद्याकडून आपले काम होईपर्यंत त्याची खुशामत करणे. |
| 152 | तितका संताप | कामाचा पसारा जितका अधिक तितकी जबाबदारी अधिक असणे |
| 153 | तीथ आहे तर भट नाही, भट आहे तर तीथ नाही | चणे आहेत तर दात नाहीत, दात आहेत तर चणे नाहीत. |
| 154 | तीन दगडात त्रिभुवन आठवते | संसार केल्यावरच खरे मर्म कळते. |
| 155 | तुकारामबुवांची मेख | न सुटणारी गोष्ट |
| 156 | तू दळ माझे आणि मी दळण गावच्या पाटलाचे | आपले काम दुसऱ्याने करावे आपण मात्र लष्कराच्या भाकरी भाजाव्यात. |
| 157 | तेरड्याचा रंग तीन दिवस | कोणत्याही गोष्टीचा ताजेपणा किंवा नवलाई अगदी कमी वेळ टिकते. |
| 158 | तेल गेले तूप गेले हाती धुपाटणे आले | मूर्खपणामुळे एकही गोष्ट साध्य न होणे. |
| 159 | तोंड दाबून बुक्क्यांचा मार | एखाद्याला विनाकारण शिक्षा करणे आणि त्याला त्याबद्दल तक्रार करण्याचा मार्ग मोकळा न ठेवणे. |
| 160 | तोबऱ्याला पुढे, लगामाला पाठीमागे | खायला पुढे कामाला मागे. |
| 161 | थेंबे थेंबे तळे साचे | दिसण्यात शुल्लक वाटणाऱ्या वस्तूंचा संग्रह कालांतराने मोठा संचय होतो. |
| 162 | थोरा घराचे श्वान सर्व ही देती मान | मोठ्या माणसांचा आश्रय हा प्रभावी ठरतो, असा आश्रय घेणाऱ्याला कारण नसताना मोठेपणा दिला जातो. |

मराठमोळा

| | | |
|---|---|---|
| 163 | दगडापेक्षा वीट मऊ | मोठ्या संकटापेक्षा लहान संकट कमी नुकसानकारक ठरतो. |
| 164 | दस की लकडी एक्का बोजा | प्रत्येकाने थोडा हातभार लावल्यास सर्वांच्या सहकार्याने मोठे काम पूर्ण होते. |
| 165 | दहा गेले, पाच उरले | आयुष्य कमी उरणे. |
| 166 | दाखविलं सोनं हसे मुल तान्हं | पैशाचा मोह प्रत्येकालाच असतो. पैशाची लालूच दाखविताच कामे पटकन होतात. |
| 167 | दात आहेत तर चणे नाहीत, चणे आहेत तर दात नाहीत | एक गोष्ट अनुकूल असली तरी तिच्या जोडीला आवश्यक ती गोष्ट अनुकूलन नसणे. |
| 168 | दात कोरून पोट भरत नाही | मोठ्या व्यवहारात थोडीशी काटकसर करून काही उपयोग होत नाही. |
| 169 | दाम करी काम, बिवी करी सलाम | पैसे खर्च केले की कोणतेही काम होते. |
| 170 | दिल चंगा तो कथौटी में गंगा | आपले अंतःकरण पवित्र असल्यास पवित्र गंगा आपल्याजवळ असते. |
| 171 | दिल्ली तो बहुत दूर है | झालेल्या कामाचा मानाने खूप साध्य करावयाचे बाकी असणे. |
| 172 | दिवस बुडाला मजूर उडाला | रोजाने व मोलाने काम करणारा थोडेच स्वतःचं समजून काम करणार ? त्याची कामाची वेळ संपते ना संपते तोच तो निघून जाणार. |
| 173 | दिव्याखाली अंधार | मोठ्या माणसातदेखील दोष असतो. |
| 174 | दुधाने तोंड भाजले, कि ताकपण फुंकून प्यावे लागते | एखाद्या बाबतीत अद्दल घडली, की प्रत्येक बाबतीत सावधगिरी बाळगणे. |
| 175 | दुभत्या गाईच्या लाथा गोड | ज्याच्या पासून काही लाभ होतो, त्याचा त्रासदेखील मनुष्य सहन करतो. |
| 176 | दुरून डोंगर साजरे | कोणतीही गोष्ट लांबून चांगली दिसते; परंतु जवळ गेल्यावर तिचे खरे स्वरूप कळते. |
| 177 | दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ दिसते; पण आपल्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही | दुसऱ्याचा लहानसा दोष आपल्याला दिसतो; पण स्वार्थामुळे स्वतःच्या मोठ्या दोषांकडे लक्ष जात नाही. |
| 178 | दृष्टीआड सृष्टी | आपल्या मागे जे चालते त्याकडे दुर्लक्ष करावे. |

| | | |
|---|---|---|
| 179 | देखल्या देवा दंडवत | सहज दिसले म्हणून चौकशी करणे. |
| 180 | देणे कुसळांचे घेणे मुसळाचे | पैसे कमी आणि काम जास्त. |
| 181 | देव तारी त्याला कोण मारी ? | देवाची कृपा असल्यास आपले कोणीही वाईट करू शकत नाही. |
| 182 | देवा दंडवत | एखादी व्यक्ती सहज भेटली तर खुशाली विचारणे. |
| 183 | देश तसा वेश | परिस्थितीप्रमाणे बदलणारे वर्तन. |
| 184 | दैव आले द्यायला अन् पदर नाही घ्यायला | नशिबाने मिळणे परंतु घेता न येणे |
| 185 | दैव उपाशी राही आणि उद्योग पोटभर खाई | नशिबावर अवलंबून असणारे उपाशी राहतात तर उद्योगी पोटभर खातात. |
| 186 | दैव देते आणि कर्म नेते | नशिबामुळे उत्कर्ष होतो; पण स्वतःच्या कृत्यामुळे नुकसान होते. |
| 187 | दैव नाही लल्लाटी, पाऊस पडतो शेताच्या काठी | नशिबात नसल्यास जवळ आलेली संधी सुद्धा दूर जाते. |
| 188 | दोन मांडवांचा वऱ्हाडी उपाशी | दोन गोष्टीवर अवलंबून असणाऱ्या चे काम होत नाही. |
| 189 | धनगराची कुत्रे लेंड्यापाशी ना मेंढ्यापाशी | कोणत्याच कामाचे नसणे. |
| 190 | धर्म करता कर्म उभे राहते | एखादी चांगली गोष्ट करत असताना पुष्कळदा त्यातून नको ती निष्पत्ती होते. |
| 191 | धार्याला (मोरीला) बोळा व दरवाजा मोकळा | छोट्या गोष्टीची काळजी घेणे परंतु मोठी कडे दुर्लक्ष करणे. |
| 192 | धिटाई खाई मिठाई, गरीब खाई गचांड्या | गुंड व आडदांड लोकांचे काम होते तर गरिबांना यातायात करावी लागते. |
| 193 | न कर्त्याचा वार शनिवार | एखादे काम मनातून करायचे नसते तो कोणत्या तरी सबबीवर ते टाळतो. |
| 194 | नऊ दिवस | कोणत्याही गोष्टीचा नवीन पणा काही काळ टिकून कालांतराने तिचे महत्त्व नाहीसे होणे. |

| | | |
|---|---|---|
| 195 | नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने | दोषयुक्त काम करणाऱ्यांच्या मार्गात एक सारख्या अनेक अडचणी येतात |
| 196 | नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ पाहू नये | नदीचे उगमस्थान व ऋषीचे कूळ पाहू नये कारण त्यात काहीतरी दोष असतोच. |
| 197 | नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे | केलेला उपदेश निष्फळ ठरणे. पालथ्या घड्यावर पाणी ओतण्याचा प्रकार. उपदेशाचा शून्य परिणाम होणे. |
| 198 | नाक दाबले, की तोंड उघडते | एखाद्या माणसाचे वर्म जाणून त्यावर योग्य दिशेने दबाव आणला, की चुटकीसरशी ताबडतोब हवे ते काम करून घेता येते. |
| 199 | नाकापेक्षा मोती जड | मालकापेक्षा नोकर शिरजोर असणे |
| 200 | नाकापेक्षा मोती जड | मालकापेक्षा नोकराचे प्रतिष्ठा वाढणे |
| 201 | नागव्यापाशी उघडा गेला, सारी रात्र हिवाने मेला | आधीच दरिद्री असणाऱ्याकडे मदतीला जाणे. |
| 202 | नागिन पोसली आणि पोसणाराला डसली | वाईट गोष्ट जवळ बाळगल्या वर ती कधी ना कधी उलटतेच |
| 203 | नागेश्वराला नागवून सोमेश्वराला वात लावणे | एकाचे लुटून दुसऱ्याला दान करणे |
| 204 | नाचता येईना अंगण वाकडे | आपल्याला एखादे काम करता येत नसेल तेव्हा आपला कमीपणा लपविण्यासाठी संबंधित गोष्टीत दोष दाखवणे |
| 205 | नाव देवाचे आणि गाव पुजाऱ्याचे | देवाच्या नावाने स्वार्थ जपणे. |
| 206 | नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा | नाव मोठे लक्षण खोटे. |
| 207 | नावडतीचे मीठ आळणी | आपल्या विरोधात असणाऱ्या माणसाने कोणतीही गोष्ट किती चांगली केली तरी आपल्याला ती वाईटच दिसते |
| 208 | नाही पण जण्याची तरी असावी | एखादी वाईट कृत्य करताना म्हणाला काही वाटले नाही तरी जगाला काय वाटेल याचा विचार करावा |

| | | |
|---|---|---|
| 209 | निंदकाचे घर असावे शेजारी | निंदा करणारा माणूस उपयोगी ठरतो त्यामुळे आपले दोष कळतात |
| 210 | नेसेन तर पैठणी (शालू) च नेसेन, नाही तर नागवी बसेन | अतिशय हटवादीपणाची वर्तन करणे |
| 211 | पडलेले शेण माती घेऊन उठते | एखाद्या चांगल्या माणसावर काहीतरी ठपका आला आणि त्याने किती जरी निवारण केले तरी त्याच्या चारित्र्यावर थोडा का होईना डाग हा पडतोच |
| 212 | पदरी पडले पवित्र झाले | कोणती गोष्ट एकदा स्वीकारली कितीला नाव ठेवणे उपयोगाचे नसते |
| 213 | पळसाला पाने तीनच | सर्वत्र सारखीच परिस्थिती असणे |
| 214 | पाचामुखी परमेश्वर | बहुसंख्य लोक म्हणतील तेच खरे मानावे |
| 215 | पाची बोटे सारखी नसतात | सर्वच माणसे सारख्याच स्वभावाची नसतात |
| 216 | पाण्यामध्ये मासा झोप घेतो कैसा जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे | अनुभव घेतल्याशिवाय शहाणपण येत नाही |
| 217 | पाप आढ्यावर बोंबलते | पाप उघड झाल्याशिवाय राहत नाही |
| 218 | पायलीची सामसूम चिपट्याची धामधूम | जिथे मोठी शांत असतात तेथे छोट्यांचा बडेजाव असतो |
| 219 | पायाची वाहन पायीच बरी | मूर्ख माणसाला अधिक सन्मान दिला तर तो शेफारतो. |
| 220 | पाहुनी आली आणि म्होतुर लावून गेली | पाहुणे म्हणून येणे आणि नुकसान करून जाणे |
| 221 | पी हळद नि हो गोरी | कोणत्याही बाबतीत उतावळेपणा करणे |
| 222 | पुढच्याच ठेच मागचा शहाणा | दुसऱ्याच्या अनुभवावरून मनुष्य काही बोध घेतो व सावधपणे वागतो |
| 223 | पुढे तिखट मागे पोचट | दिसायला फार मोठी पण प्रत्यक्षात तसे नसणारे |
| 224 | पुत्र मागण्यास गेली भ्रतार नवरा घालवून आली | फायदा होईल म्हणून जाणे परंतु नुकसान होणे |

मराठमोळा

| | | |
|---|---|---|
| 225 | पै दक्षिण लक्ष प्रदक्षिणा | पैसा कमी काम जास्त |
| 226 | पोटी कस्तुरी वासासाठी फिरे भिरीभिरी | स्वतः जवळच असणारी वस्तू शोधण्यासाठी इतरत्र फिरणे |
| 227 | पोर होईल ना व सवत साहिना | आपल्याकडून होत नाही व दुसऱ्यालाही करू द्यायचे नाही |
| 228 | फासा पडेल तो डाव राजा बोलेल तो न्याय | राजाने दिलेला न्याय मनाविरुद्ध असला किंवा चुकीचा असला तरी तो मानावा लागतो |
| 229 | फुटका डोळा काजळाने साजरा करावा | आपल्या अंगचा जो दोष नाहीसा होण्यासारखा नसतो तो झाकता येईल तितका झाकावा |
| 230 | फुल ना फुलाची पाकळी | वास्तविक जितके द्यायला पाहिजे तितके देण्याचे सामर्थ्य नसल्यामुळे त्यापेक्षा पुष्कळ कमी देणे |
| 231 | फुले वेचली तिथे गोवर्या वेचणे | जेथे सुख भोगले तेथे वाईट दिवस पाहण्याचे नशिबी येणे |
| 232 | बकरीचे शेपूट माशाही वारीना व लाजही राखीना | निरुपयोगी गोष्ट |
| 233 | बडा घर पोकळ वासा | दिसण्या श्रीमंती पण प्रत्यक्षात तिचा अभाव |
| 234 | बळी तो कान पिळी | बलवान मनुष्य इतरांवर सत्ता गाजवितो |
| 235 | बाप तसा बेटा | बापाच्या अंगचे गुण मुलात उतरणे |
| 236 | बाप से बेटा सवाई | वडिलांपेक्षा मुलगा अधिक कर्तबगार |
| 237 | बारक्या फणसाला म्हैस राखण | ज्याच्या पासून धोका आहे त्याच्याकडे संरक्षणाची जबाबदारी सोपविणे |
| 238 | बावळी मुद्रा देवळी निद्रा | दिसण्यास बावळट पण व्यवहारचतुर माणूस |
| 239 | बुडत्याला काडीचा आधार | घोर संकट काळी मिळालेली थोडीशी मदत देखील महत्त्वाची ठरते |
| 240 | बैल गेला आणि झोपा केला | एखादी गोष्ट होऊन गेल्यावर तिचे निवारण करण्यासाठी केलेली व्यवस्था व्यर्थ ठरते |
| 241 | बोडकी आली व केस कर झाली | विधवा आली अन लग्न लावून गेली |

| | | |
|---|---|---|
| 242 | बोलेल तो करेल | काय केवळ बडबड करणाऱ्याकडून काहीही होऊ शकत नाही |
| 243 | भटाला दिली ओसरी भट हातपाय पसरी | एखाद्याला आश्रय दिला तर तो त्यावर समाधान न मानता अधिक फायदा घेण्याचा प्रयत्न करतो |
| 244 | भरवशाच्या म्हशीला टोणगा | ज्या व्यक्तीवर अति विश्वास आहे नेमक्या अशाच व्यक्ती कडून विश्वासघात होणे |
| 245 | भागीचे घोडे की किवणाने मेले | भागीदारीतील या गोष्टीचा लाभ सर्वच घेतात काळजी मात्र कोणीच घेत नाही |
| 246 | भिंतीला कान असतात | गुप्त गोष्ट उघड झाल्याशिवाय राहात नाही |
| 247 | भित्यापाठी ब्रह्मराक्षस बिद्री | व्यक्ती काही कारण नसताना भीत असते |
| 248 | भीक नको पण कुत्रा आवर | एखाद्याच्या मनात नसले तर त्याने मदत करू नये परंतु निदान आपल्या कार्यात अडथळा आणू नये अशी स्थिती |
| 249 | भीड भिकेची बहीण | उगाच मनात भीती बाळगून आपण एखाद्याला नकार देऊ शकलो नाही तर शेवटी आपणावर भीक मागण्याची पाळी येणे |
| 250 | मऊ सापडले म्हणून कोपराने खणू नये | कोणाच्याही चांगुलपणाचा गैरफायदा घेऊ नये |
| 251 | मन जाणे पाप आपण | केलेले पाप दुसऱ्याला कळाले नाही तरी ज्याचे त्याला ते माहीत असतेच |
| 252 | मन राजा मन प्रजा | हुकुम करणारे आपले मनच ते पाळणारे ही आपली मनच असते |
| 253 | मनात मांडे पदरात धोंडे | केवळ मोठ मोठी मनोराज्य करायचे परंतु प्रत्यक्षात पदरात काहीही पडत नाही अशी स्थिती |
| 254 | मनी वसे ते स्वप्नी दिसे | ज्या गोष्टींचा आपण सतत ध्यास लागलेला असतो ती गोष्ट स्वप्नात दिसणे |
| 255 | मल्हारी माहात्म्य | नको तिथे नको ती गोष्ट करणे. |
| 256 | मांजरीचे दात तिच्या पिल्लाला लागत नाही | आई वडिलांचे बोलणे लेकराच्या हिताचेच असते |
| 257 | माणकीस बोललं, झुणकीस लागलं | एकाला बोलणे अन् दुसऱ्या लागणे |

| | | |
|---|---|---|
| 258 | मानेवर गळू आणि पायाला जळू | रोग एकीकडे उपाय भलतीकडे |
| 259 | मामुजी मेला अन् गांव गोळा झाला | क्षुल्लक गोष्टीचा गवगवा करणे |
| 260 | मारुतीची शेपूट | लांबत जाणारे काम |
| 261 | मुंगीला मिळाला गहू कुठे नेऊ अन् कुठे ठेवू | छोट्याशा गोष्टींनीही हुरळून जाणे |
| 262 | मुंगीला मुताचा पूर | लोकांना लहान संकट ही डोंगराएवढी वाटते |
| 263 | मुलाचे पाय पाळण्यात दिसतात | लहान वयातच व्यक्तीच्या गुणदोषांचे दर्शन होते |
| 264 | मूर्ख लोक भांडते वकील घरी बांधते | मूर्खांचे भांड अन् तिसऱ्याचा लाभ |
| 265 | म्हशीला मणभर दूध | मेल्यावर गुणगान करणे |
| 266 | म्हातारीने कोंबडे लपविले म्हणून उजडायचे राहत नाही | निसर्ग नियमानुसार ज्या घटना घडायच्या त्या घडतातच म्हशीचे दुध काढतांना आधी आचळाला दूध लागावे लागते फायदा उचलण्यासाठी आधी थोडी खुशामत करावी लागते |
| 267 | यथा राजा तथा प्रजा | सर्वसामान्य लोक नेहमी मोठ्यांचे किंवा वरिष्ठांचे अनुकरण करतात |
| 268 | या बोटाची थुंकी त्या बोटावर करणे | बनवाबनवी करणे |
| 269 | ये रे कुत्र्या खा माझा पाय | आपण होऊन संकट ओढवून घेणे |
| 270 | रंग जाणे रंगारी | ज्याची विद्या त्यालाच माहीत |
| 271 | रडत राऊत रडत राव घोड्यावर स्वार | इच्छा नसताना जबाबदारी अंगावर पडणे |
| 272 | राईचा पर्वत करणे | मूळ गोष्ट अगदी क्षुल्लक असता तिचा विपर्यास करून सांगणे |
| 273 | राज्याचे घोडे आणि खासदार उडे | वस्तू एकाची मिजास दुसऱ्याची |
| 274 | रात्र थोडी सोंगे फार | कामे भरपूर पण वेळ थोडा असणे |
| 275 | रामाशिवाय रामायण कृष्णाशिवाय महाभारत | मुख्य गोष्टीचा अभाव |

| | | |
|---|---|---|
| 276 | रे माझ्या मागल्या | ताक कण्या चांगल्या एखाद्याने केलेला उपदेश ऐकून न घेता पूर्वीप्रमाणेच वागणे |
| 277 | रोज मरे त्याला कोण रडे | तीच ती गोष्ट वारंवार होऊ लागली म्हणजे तिच्यातील स्वारस्य नष्ट होते व तिच्याकडे कोणीही लक्ष देत नाही |
| 278 | लंकेत सोन्याच्या विटा | दुसरीकडे असलेल्या फायद्याच्या गोष्टीचा आपल्याला उपयोग नसतो |
| 279 | लकडी दाखविल्या शिवाय मकडी वळत नाही | धाका शिवाय शिस्त नाही |
| 280 | लग्नाला गेली आणि बारशाला आली | अतिशय उशिराने पोहोचणे |
| 281 | लग्नाला वीस तर वाजंत्री ला तीस | मुख्य कार्य पेक्षा गौण कार्यालाच खर्च अधिक लष्कराच्या भाकऱ्या भाजणे बिन फायद्याचा आणि निरर्थक उद्योग करणे |
| 282 | लाज नाही मला कोणी काही म्हणा | निर्लज्ज मनुष्य दुसऱ्याच्या टीकेची पर्वा करत नाही |
| 283 | लेकी बोले सुने लागे | एकाला उद्देशून पण दुसऱ्याला लागेल असे बोलणे |
| 284 | लोका सांगे ब्रह्मज्ञान स्वतः मात्र कोरडे पाषाण | लोकांना उपदेश करायचा पण स्वता मात्र त्याप्रमाणे वागायचे नाही |
| 285 | वरातीमागून घोडे | योग्य वेळ निघून गेल्यावर काम करणे |
| 286 | वळणाचे पाणी वळणावर जाणे | निसर्गाच्या नियमाप्रमाणे ज्या गोष्टी घडायच्या त्या घडतच राहणार |
| 287 | वाघ म्हटले तरी खातो आणि वाघोबा म्हटले तरी खातोच | वाईट व्यक्तीला चांगली म्हंटले किंवा वाईट तरी त्रास द्यायचा तो देणारच |
| 288 | वारा पाहून पाठ फिरविणे | परिस्थिती पाहून वर्तन करणे |
| 289 | वासरात लंगडी गाय शहाणी | मूर्ख माणसा अल्पज्ञान असणारा श्रेष्ठ असतो |
| 290 | वाहत्या गंगेत हात हात धुणे किंवा आपल्या तव्यावर पोळी भाजून घेणे | सर्व साधने अनुकूल असली की होईल तो फायदा करून घेणे |
| 291 | विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर | गरजेपुरते गोष्टी घेऊन फिरणे |

| | | |
|---|---|---|
| 292 | विचाराची तूट तेथे भाषणाला उत | मूर्खांच्या गर्दीत नेहमी नुसती बडबड असते |
| 293 | विशी विद्या तिशी धन | योग्य वेळेत योग्य कामे केली की त्यावरून कर्तुत्वाचा अंदाज बांधता येतो |
| 294 | विश्वासही ठेवला घरी चारी सुना गरवार करी | विश्वासघात करणे |
| 295 | शहाण्याला शब्दाचा मार | शहाण्या माणसाला त्याच्या चुकी बाबत शब्दांनी समज दिली तरी ते पुरेसे असते |
| 296 | शितावरून भाताची परीक्षा | वस्तूच्या लहान भागावरून त्या संपूर्ण वस्तूची परीक्षा होती |
| 297 | शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी | चांगल्या च्या पोटी चांगल्याच गोष्टी येतात |
| 298 | शेजी देईल काय आणि मन धायेल काय ? | शेजारणीने एखादा पदार्थ सढळ हाताने करून दिला तरीच मनाची तृप्ति होऊ शकत नाही |
| 299 | शेजीबाईची कढी, धावधाव वाढी | एकाची वस्तू घेऊन दुसऱ्यावर उपकार दाखविणे |
| 300 | शेरास सव्वाशेर | चोरावर मोर एकाला दुसरा वरचढ भेटणे |
| 301 | श्रीच्या मागोमाग ग येतो | संपत्तीबरोबर गर्व येतो |
| 302 | संग तसा रंग | संगती प्रमाणे वर्तन असणे |
| 303 | संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून सुरुवात | एखाद्या गोष्टीचा आरंभ मुळापासून करणे |
| 304 | सगळेच मुसळ केरात | मुख्य महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष झाल्याने घेतलेले सर्व परिश्रम वाया जाणे |
| 305 | समर्थाघरचे श्वान त्याला सर्व देती मान | मोठा च्या घरच्या शूद्रालाही मान द्यावा लागतो |
| 306 | सरड्याची धाव कुंपणापर्यंतच | प्रत्येकाच्या कामास त्याची शक्ती वा वकूब यांची मर्यादा पडते |
| 307 | सांगी तर सांगी म्हणे वडाला वांगी | एकदम अशक्य कोटीतील गोष्ट करणे |
| 308 | सात हात लाकुड नऊ हात ढलपी | एखादी गोष्ट खूप फुगवून सांगणे |
| 309 | साप साप म्हणून भुई धोपटणे | संकट नसताना त्याचा अभ्यास निर्माण करणे |

| | | |
|---|---|---|
| 310 | सारा गांव मामाचा एक नाही कामाचा | जवळच्या अशा अनेक व्यक्ती असणे पण त्यापैकी कोणाचाच उपयोग न होणे |
| 311 | सुंभ जळाला तरी पीळ जात नाही | वैभव गेले तरी ताठा जात नाही |
| 312 | सुरुवातीलाच माशी शिंकली | आरंभालाच अपशकून |
| 313 | स्नान करून पुण्य घडे तर पाण्यात बेडूक काय थोडे | वरवरच्या अवडंबराने पुण्य मिळत नाही |
| 314 | हत्ती गेला पण शेपूट राहिले | कामाच्या बहुतेक भाग पूर्ण झालं आणि फक्त थोडे शिल्लक राहिला |
| 315 | हत्ती बुडतो अन् शेळी ठाव मागते | जेथे भलेभले हात टेकतात तेथे लहान बडेजाव दाखवितात |
| 316 | हत्तीच्या दाढे मध्ये मिऱ्याचा दाणा | मोठ्या उपायांची गरज असताना अतिशय छोटे उपाय करावे |
| 317 | हत्तीच्या पायी येते आणि मुंगीच्या पायी जाते | आजार, संकटे येतात ती लवकर आणि मोठ्या प्रमाणावर येतात पण कमी होताना हळूहळू कमी होतात |
| 318 | हलवायाच्या घरावर तुळशीपत्र | परस्पर दुसऱ्याची वस्तू तिसऱ्याला देणे स्वतःला झीज लागू न देणे |
| 319 | हाजिर तो वजीर | जो ऐन वेळेला हजर असतो त्याचाच फायदा होतो |
| 320 | हात ओला तर मित्र भला | म्हणजेच तुमच्या पासून काही फायदा होणार असेल तर लोक तुमचे गोडवे गातात |
| 321 | हात फिरे तिथे लक्ष्मी वसे | उद्योगी माणसाच्या घरी संपत्ती नांदते |
| 322 | हातचे सोडून पळत्याच्या मागे लागणे | जे आपल्या हातात आहे ते सोडून दुसरे मिळेल या आशेने हातातली सोडण्याची पाळी येणे |
| 323 | हातच्या काकणाला आरसा कशाला | स्पष्ट असलेल्या गोष्टीला पुरावा नको |
| 324 | हिरा तो हिरा गार तो गार | गुणी माणसाचे गुण प्रकट झाल्यावाचून राहत नाहीत |
| 325 | हिऱ्या पोटी गारगोटी | चांगल्या च्या पोटी नाठाळ |
| 326 | हृदयाचा उन्हाळा आणि डोळ्यांच्या पावसाळा | खोटे अश्रू ढाळणे |

| | | |
|---|---|---|
| 327 | होळी जळाली आणि थंडी पळाली | होळीनंतर थंडी कमी होते |

https://marathmola.in/